MHBI080014912019

## नि.दि.दा.क्र. ५२८/२०१९ मधील निशाणी क्र.५ खालील आदेश

वादींनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्याविरुध्द त्यांनी स्वतः किंवा इतरांमार्फत दावा मिळकतीवरील वादींच्या कब्जे उपभोगास हरकत अडथळा करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**वादींचे थोडक्यात कथन खालील प्रमाणे आहे**.

२. जमीन गट क्र.२१४, एकूण क्षेत्र ०८ हे. २३ आर. पैकी प्रतिवादी क्र.४ चे नावावरील ०१ हे. ६२ आर पैकी पश्चिम बाजूकडील जागा जी दक्षिण बाजूने पूर्व – पश्चिम १२५ फुट, उत्तर बाजूने ९० फुट, लांबी दक्षिणोत्तर पश्चिम बाजूने २३० फुट व पूर्व बाजूने २२० फुट आहे व जिच्या चतुःसिमा पूर्वेस – गट क्र.२१४ मधील उर्वरीत जमीन, पश्चिमेस – गट क्र.२१७ मधील वादी व प्रतिवादी क्र.६ ते ११, दक्षिणेस – गट क्र.२१६ व उत्तरेस – रस्ता अशा असून ही दावा मिळकत आहे.

३. प्रतिवादी क्र.६ ते ९ हे सख्खे भाऊ असून वादी हा त्यांचा सावत्र भाऊ आहे. प्रतिवादी क्र.१० व ११ हे वादीचा सख्खा भाऊ मयत हिरालाल याची मुले आहेत. वादी व प्रतिवादी क्र.६ ते ११ यांची गट क्र.२१७ मध्ये वडिलोपार्जीत जमीन असून ते त्या जमिनीचे मालक व कब्जेदार आहेत. गट क्र.२१७ च्या पूर्व बाजूला जमीन गट क्र.२१४ ही आहे. वादी व प्रतिवादी क्र.६ ते ९ चे वडील नामे पन्नालाल नहार हे दावा मिळकतीचे ता.२०.०५.१९५० ते हयात असेपर्यंत कब्जेदार होते. वादी व प्रतिवादी क्र.६ ते ११ हे दावा मिळकतीचे ता.१२.०७.१९८८ पासून कब्जेदार आहेत. त्यांच्या कब्जाला आजपर्यंत कोणीही व कधीही आक्षेप घेतलेला नसून ते दावा मिळकतीचे शांततामय विरूद्ध कब्जा हक्काने मालक व कब्जेदार झाले आहेत. प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी गट क्र.२१४ ची हद्द बंदी करणेबाबत प्रतिवादी क्र.३ चे कार्यालयात अर्ज दिला. सदरचे अर्जावरुन क्र.भूमापन/

अतितातडी/हद्दीकायम/मो.र.क्र.११७/२०१७ अन्वये त्यांनी ता.२१.१२.२०१७ व २२.१२.२०१७ रोजी मोजणी करुन नकाशा तयार केला. त्यावेळी वादी व प्रतिवादी क्र.६ ते ११ यांचा दावा मिळकतीवर कब्जा असल्याचे निष्पन्न झाले.

४. प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी सदरचा वादींचा ताबा मान्य केला व ते सदरच्या जागेवर कधीही अधिकार सांगणार नाहीत असे त्यांनी तोंडी आश्वासन दिले. त्यानंतर वादींनी प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्याविरूद्ध नि.दि.दा.क्र.५७५/२०१७ हा दाखल केला होता. त्यामध्ये प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी वादींना त्यांचे गट क्र.२१६ मध्ये जाण्यासाठी गट क्र.२१४ मधून रस्ता सोडला होता व त्याबाबतची तडजोड झाली होती. वादी व प्रतिवादी क्र.६ ते ११ यांचा दावा मिळकतीवर प्रत्यक्ष कब्जा आहे, हे प्रतिवादी क्र.४ व ५ यांना माहीत असूनसुद्धा त्यांनी दावा मिळकतीवर ता.१२.०९.२०१९ रोजी कब्जा करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी वादींनी प्रतिवादी क्र.४ व ५ यांना तसे न करण्याबाबत विनंती केली असता त्यांनी राजकीय बळाचा वापर करुन वादींची विनंती फेटाळून लावली. त्यानंतर वादींनी प्रतिवादी क्र.६ ते ११ यांना सांगितले की प्रतिवादी क्र.४ व ५ यांच्याविरूद्ध आपण कार्यवाही करु व न्यायालयात दावा दाखल करु परंतु त्यांनी त्यास नकार दिला. त्यामुळे वादींनी प्रतिवादी क्र.६ ते ११ यांना प्रतिवादी म्हणून सामील केले आहे.

५. वादींनी त्याच दिवशी म्हणजे ता.१२.०९.२०१९ रोजी प्रतिवादी क्र.४ व ५ यांचे कृत्याबाबत प्रतिवादी क्र.१ व २ यांना माहिती दिली परंतु त्यांनी वादींची मागणी फेटाळून लावली. त्याच दिवशी वादींनी प्रतिवादी क्र.३ यांना दावा मिळकतीवर येऊन क्र.भूमापन/अतितातडी/हद्दीकायम/मो.र.क्र.११७/२०१७ अन्वये ता.२१.१२.२०१७ त्यांच्या हद्दीच्या खुणाप्रमाणे दगड निश्चीत करुन देण्यास सांगितले असता त्यांनी त्यास नकार दिला. प्रतिवादी क्र.४ व ५ हे राजकीय बळाचा व त्यांचे पदाचा दुरुपयोग करुन वादींचे दावा मिळकतीचे कब्जास सतत हरकत व अडथळा करत आहेत. तसेच ते वादींना दावा मिळकतीमधून बेदखल करण्याचे प्रयत्नात आहेत. त्यांनी जर वादींना दावा मिळकतीतून बेदखल केले तर वादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. सदरचा वाद वादींचे बाजूने सकृतदर्शनी आहे. म्हणून वादींनी सदरचा दावा हा ते दावा मिळकतीचे

समाईक कब्जेदार आहेत व ते दावा मिळकतीचे विरूद्ध कब्जाहक्काने मालक झाले आहेत असा ठराव होऊन मिळण्यासाठी व प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी वादी व प्रतिवादी क्र.६ ते ११ यांच्या दावा मिळकतीच्या कब्जे उपभोगास स्वतः किंवा इतरांमार्फत हरकत अडथळा करु नये असा कायमचा मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केला आहे. सदरचे दाव्याचे कामकाज चालून अंतिम निकाल लागण्यास बराच कालावधी जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे वादींनी तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यासाठी सदरचा अर्ज केलेला आहे व तो मंजूर करण्याची विनंती केली आहे.

६. प्रतिवादी क्र. ४ ने नि.क्र.३३ वर कैफीयत दिली असून सदरची कैफीयत ही त्याचा सदरच्या अर्जास जबाब म्हणून स्विकारण्यासाठी नि.क्र.३५ वर त्याने पुरसीस दिलेली आहे. त्याने वादींच्या अर्जातील कथन नाकारले आहे. त्याने पुढे कथन केले आहे की, दावा मिळकत ही त्याच्या कायदेशीर मालकीची कब्जे वहिवाटीतील आहे. दावा मिळकतीशी वादींचा कोणताही हक्क व हितसंबंध नाही. दावा मिळकतीवर वादींचा व प्रतिवादी क्र.६ ते ११ यांचा कधीही कब्जा नव्हता व नाही. मोजणी रजिस्टर क्र.११७/२०१७ अन्वये मोजणीच्या वेळी दावा मिळकतीवर वादी किंवा आणखी दुसऱ्या कोणाचाही ताबा किंवा अतिक्रमण असल्याचे दिसून आले नाही. सदरचे मोजणीप्रमाणे प्रतिवादी क्र.४ चे मालकीचे व कब्जातील गट क्र.२१४ मधील १.६२ हे. आर क्षेत्र मोजणी करुन त्याबाबतच्या हद्दी खुणा कायम करण्यात आल्या आहेत व त्याप्रमाणे नकाशा तयार करण्यात आला आहे. सदरचे मोजणीचे विरूद्ध वादींनी कोठेही हरकत घेतली नाही किंवा अपील दाखल केलेले नाही. त्यामुळे सदरची मोजणी अंतीम झालेली आहे. दावा मिळकत ही मौल्यवान जागा असल्यामुळे ती हडप करण्यासाठी वादींनी सदरचा खोटा दावा व अर्ज दाखल केला आहे. दावा मिळकतीचा सध्याचा गट क्र.२१४ असून त्याचा पूर्वीचा मूळ स.क्र.१०७ व १०८ असा होता. महाराष्ट्र शासनाने एकत्रीकरण योजनेनुसार मूळ स.क्र.१०७ व १०८ एकत्रीत करुन त्याचे रुपांतर गट क्र.२१४ मध्ये केले आहे. वडवणी तालुका निर्माण होण्यापूर्वी वडवणी हे गाव केज तालुक्यात होते. वडवणी शहर येथे सध्या नगर पंचायत असून प्रतिवादी क्र.४ हा तिचा मुख्याधिकारी आहे.

७. सन १९७० पूर्वी वडवणी येथे बाजारासाठी जागा नव्हती. दावा मिळकतीचा मूळ मालक व कब्जेदार श्री. शामराम राजारामपंत कुलकर्णी हा होता. त्याचे मालकीचे एकूण क्षेत्र ८.३५ हे. आर. होते व त्यापैकी ०४ एकर जागा वडवणी बाजार तळासाठी मा. जिल्हाधिकारी यांनी ता.११.१२.१९७२ रोजी संपादीत केली. संपादीत क्षेत्र मूळ मालक शामराव कुलकर्णी यांचे मालकी हक्कातून कमी करुन ते प्रतिवादी क्र.४ चे हक्कात नोंदविण्यात आले आहे. सदरचे क्षेत्र तत्कालीन ग्रामपंचायतीचे सरपंच श्री. सखाराम राणूजी झाडे यांना पंचासमक्ष ता.०६.०१.१९७१ रोजी कब्जे पावती, पंचनामा करुन ताब्यात दिले. सदरचे भू–संपादनाबाबतच्या संचिकेत रितसर अवार्ड व ई–स्टेटमेंट करुन त्याचा मावेजा मूळ मालकाला देण्यात आला आहे. सदरची जागा प्रतिवादी क्र.४ चे ताब्यात दिली असून तिच्या चतुःसिमा पूर्वेस– स.क्र.१०७ व १०८/१ चा काही भाग, पश्चिमेस– स.क्र.११०, दक्षिणेस – स.क्र.१०९ व १०८/१ चा काही भाग आणि उत्तरेस सरकारी गाडी रस्ता अशा आहेत. त्यावेळेपासून पूर्वी ग्रामपंचायत वडवणी व सध्या नगर पंचायत, वडवणी मार्फत मुख्याधिकारी म्हणजेच प्रतिवादी क्र.४ हे दावा मिळकतीचे कायदेशीर मालक व कब्जेदार आहेत. सदरचे भू–संपादन प्रक्रियेनुसार फेरफार नोंद क्र.३६९ अन्वये ता.१०.११.१९७६ रोजी दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर प्रतिवादी क्र.४ चे नाव नोंदविण्यात आले आहे. सन १९७६ पासून प्रतिवादी क्र.४ दावा मिळकतीचा कायदेशीर मालक असून तिचा तो शांततामय मार्गाने उपभोग घेत आहे. सदरचे दावा मिळकतीचे मालकी व कब्जा बाबत वादींना माहिती आहे.

८. प्रतिवादी क्र.४ च्या मालकीच्या काही क्षेत्रावर काही लोकांनी बीडकडे जाणारे रस्त्याचे बाजूने म्हणजेच उत्तरेकडील बाजूने अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे प्रतिवादी क्र.४ ने संबंधीत अतिक्रमण धारकांना ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम–५३ प्रमाणे ता.३१.०८.२०१३ रोजी कायदेशीर नोटीसा देऊन अतिक्रमण काढण्याबाबत कळवले. त्यानंतर संबंधीत अतिक्रमणधारकांनी प्रतिवादी क्र.४ सह जिल्हाधिकारी, बीड व विभागीय आयुक्त औरंगाबाद यांचेविरूद्ध मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका क्र.१११३/२०१४ दाखल केली होती. सदरचे याचिकेत मा. उच्च न्यायालयाने ता.१७.०२.२०१६ रोजी आदेश करुन मा.

जिल्हाधिकारी, बीड यांना नोटीस देऊन नियमानुसार निर्णय घेण्याचे व कार्यवाही करण्याचे आदेशीत केले. सदरचे आदेशानुसार जिल्हाधिकारी, बीड यांच्यासमोर संचिका क्र.२०१६/मशाका/जमा–१/प्र.क्र./कावि यामध्ये वादींनी ता.०९.०३.२०१६ रोजी अर्ज देऊन त्याला सामील करण्याची मागणी केली व ती मंजूर करण्यात आली होती. त्यानंतर जिल्हाधिकारी, बीड यांनी वादी व प्रतिवादी क्र.४ यांचे म्हणणे ऐकूण वादीची मागणी ता.२४.०६.२०१६ रोजी फेटाळून लावली. त्यामध्ये वादीचे मालकी हक्काबाबतची मागणीसुद्धा फेटाळण्यात आलेली आहे. जिल्हाधिकारी यांचे आदेशानुसार संबंधीत अतिक्रमण धारकांनी अतिक्रमणे काढून टाकली व त्यावर सध्या प्रतिवादी क्र.४ चा मालकी हक्क व कब्जा आहे. वादीने ता.२४.०६.२०१६ च्या जिल्हाधिकारी यांच्या निर्णयाविरूद्ध विभागीय आयुक्त औरंगाबाद यांच्याकडे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम–२५७ अन्वये अपील दाखल केले आहे व ते प्रलंबीत आहे. सदरचे अपील प्रलंबीत असताना वादींनी पुन्हा जिल्हाधिकारी यांच्या त्याच आदेशाविरूद्ध याचिका क्र.१३७४८/२०१७ ही दाखल केली असून ती प्रलंबीत आहे. सदरची दोन्ही प्रकरणे न्यायप्रविष्ट असताना वादीने सदरचा बेकायदेशीर दावा दाखल केला आहे. त्यामुळे वरील दोन्ही प्रकरणांचा निकाल लागेपर्यंत सदरचा दावा स्थगीत ठेवणे आवश्यक आहे. तसेच वादीचा दावा मुदतीत नाही.

९. सन २०१६–२०१७ मध्ये प्रतिवादी क्र.४ ने दावा मिळकतीचे गट क्र.२१४ मध्ये शॉपींगकॉम्प्लेक्सचे बांधकाम चालू केले होते. त्यावेळीसुद्धा वादींनी सदर नगरविकासाचे काम बंद पाडण्याचे हेतूने न्यायालयात प्रतिवादी क्र.४ विरूद्ध नि.दि.दा.क्र. ५७५/२०१७ हा दाखल केला होता. त्यामध्ये वादींना प्रतिवादी क्र.४ च्या मालकीच्या जागेतून रस्ता सोडण्याची मागणी केली होती व सार्वजनिक रस्त्यावरुन ये–जा करण्यास अडथळा करु नये अशी मागणी केली होती. त्या दाव्यात सार्वजनिक हीत लक्षात ठेवून प्रतिवादी क्र.४ व वादी यांचेत तडजोड झाली सदरचे तडजोड पत्राच्या आधारे रस्त्यावरुन ये–जा करण्याचा वादीसह सर्वांना सार्वजनिक स्वरुपाचा वहिवाटीचा हक्क मान्य करण्याव्यतिरीक्त इतर कुठलाही हक्क व अधिकार व हितसंबंध प्रतिवादी क्र.४ ने किंवा इतर कोणीही मान्य केला नव्हता व नाही. वादींनी प्रतिवादी क्र.४ ला जाणीवपूर्वक त्रास देण्याच्या हेतूने सदरचा खोटा

दावा व खोटा तात्पुरत्या मनाई हुकूमाचा अर्ज दाखल केला आहे. म्हणून शेवटी त्याने वादींचा सदरचा तात्पुरत्या मनाई हुकूमाचा अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली आहे.

१०. प्रतिवादी क्र. ५ ने नि.क्र.३६ वर कैफीयत दिली असून सदरची कैफीयत ही तिचा सदरच्या अर्जास जबाब म्हणून स्विकारण्यासाठी नि.क्र.३८ वर तिने पुरसीस दिलेली आहे. तिने वादींच्या अर्जातील कथन नाकारले आहे. प्रतिवादी क्र.४ ने जो नि.क्र.५ च्या अर्जास जबाब दिलेला आहे तोच प्रतिवादी क्र.५ ने जबाब दिलेला आहे. त्यामुळे त्याची पुनरावृत्ती करणे आवश्यक नाही. प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी सदरच्या अर्जास जबाब न दिल्यामुळे त्यांच्या जबाबाशिवाय सदरच्या अर्जाचे कामकाज चालविण्यात येत आहे. प्रतिवादी क्र.२ याला सदरच्या दाव्याचे समन्स बजावूनसुद्धा तो दाव्यात हजर न झाल्यामुळे त्याच्याविरूद्ध एकतर्फा चौकशीचा आदेश पारित करण्यात आला आहे.

११. वादी व प्रतिवादींचे वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्यावर मी माझे कारणांसह निष्कर्ष नोंदवीत आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | हे प्रकरण प्रथम दर्शनी वादींच्या बाजूने आहे काय? | नाही. |
| २. | वादी हे स्वच्छ हाताने न्यायालयात आले आहेत काय? | नाही. |
| ३. | न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने झुकणारा आहे काय? | नाही. |
| ४. | तात्पुरता मनाई हुकूम न दिल्यास वादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे काय? | नाही. |
| ५. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र. १ बाबत

१२. मी वादींतर्फे विद्वान वकील श्री. देशमुख व प्रतिवादी क्र.४ तर्फे विद्वान वकील श्री. गित्ते व प्रतिवादी क्र. ५ तर्फे विद्वान वकील श्री. मुंडे यांचा युक्तिवाद ऐकला. वादींचे विद्वान वकीलांनी युक्तिवाद केला की, दावा मिळकत जरी प्रतिवादी क्र.४ च्या

नावावर असली तरी त्यावर वादी व प्रतिवादी क्र.६ ते ९ यांचे वडील श्री. पन्नालाल यांचा सदरचे मिळकतीवर ता.२०.०५.१९५० पासून ताबा आहे. वादी व प्रतिवादी क्र.६ ते ११ यांचा दावा मिळकतीवर ता.१२.०५.१९८८ पासून प्रत्यक्ष ताबा आहे व त्यांना कोणीही आक्षेप घेतलेला नाही. त्यामुळे ते दावा मिळकतीचे विरुद्ध कब्जाहक्काने मालक झालेले आहेत. सदरचा कब्जा मिळविण्यासाठी प्रतिवादी क्र.४ ने वादींविरुद्ध कधीही दावा दाखल केला नाही. मो.र.क्र.११७/२०१७ मध्ये सुद्धा दावा मिळकतीवर वादी व प्रतिवादी क्र.६ ते ११ यांचा ताबा असल्याचे निष्पन्न झाले आहे. प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी ता.१२.०९.२०१९ रोजी दावा मिळकतीवर कब्जा करण्याचा प्रयत्न केला. प्रतिवादी क्र.४ व ५ हे दावा मिळकतीचा कब्जा घेण्याचा प्रयत्न करत आहेत. म्हणून वादींनी सदरचा दावा ते व प्रतिवादी क्र.६ ते ११ हे दावा मिळकतीचे विरूद्ध कब्जाहक्काने मालक झाले आहेत असा ठराव होऊन मिळण्यासाठी व त्यांच्या कब्जास प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी हरकत अडथळा करु नये असा कायमचा मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केला असून दाव्याचा निकाल लागेपावेतो प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी वादींच्या कब्जेउपभोगास हरकत अडथळा करु नये म्हणून तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे व तो मंजूर करण्याची विनंती केली आहे. त्यांनी त्यांचे युक्तीवादाचे प्रित्यर्थ, **“रामे गौडा (मयत) वारसांमार्फत विरूद्ध एम. वराडाप्पा नायडू (मयत) वारसांमार्फत आणि इतर, २००३ एस.टी.पी.एल. १९०००, सर्वोच्च न्यायालय"** या अधिनिर्णयाचा आधार घेतला आहे.

१३. याउलट प्रतिवादी क्र.४ च्या विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र. ४ हा दावा मिळकतीचा मालक आहे हे वादींनी मान्य केले आहे. दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर मालक किंवा कब्जेदार सदरी वादी व प्रतिवादी क्र.६ ते ११ यांची नावे नाहीत. दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर वादींनी त्यांची नावे लावण्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. मा. जिल्हाधिकारी, बीड यांनी ता.२४.०६.२०१६ च्या आदेशान्वये वादींची मागणी फेटाळून लावली आहे. सदरचे जिल्हाधिकारी यांचे आदेशाविरूद्ध वादींनी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे अपील दाखल केले आहे व ते प्रलंबीत आहे. तसेच सदरचे जिल्हाधिकारी यांचे आदेशाविरूद्ध वादींनी मा. उच्च न्यायालयात याचिका क्र.१३७४८/२०१७ ही दाखल केली आहे व ती

प्रलंबीत आहे. तसेच माजलगाव येथील न्यायालयात नि.दि.दा.क्र.२७८/२०२३ हा प्रलंबीत असून त्यातील तात्पुरत्या मनाई हुकूमाचा अर्ज न्यायालयाने नामंजूर केला आहे. सदरच्या बाबी वादींनी लपवून ठेवल्या आहेत. वादींनी सदरचे दाव्यात ते विरुद्ध कब्जा हक्काने मालक झाले आहेत असे वादकथन केले आहे परंतु विरूद्ध कब्जा हक्काचे घटकाबाबत त्यांनी सखोल वादकथन केले नाही. दावा मिळकतीमध्ये आठवडा बाजार भरत असल्यामुळे तिचा ताबा वादींकडे असण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच अगोदरच्या दाव्यात जी तडजोड झाली आहे ती फक्त वादींना त्यांच्या शेतात जाण्या–येण्यासाठी फक्त परवानगी देण्यात आलेली आहे. वादींनी तथाकथीत मोजणीचा पंचनामा व नकाशा दाखल केला नाही. नवीन मोजणीप्रमाणे दावा मिळकतीवर प्रतिवादी क्र.४ चा ताबा आहे. सदरच्या मोजणीप्रमाणे हद्दी खुणा करु नये म्हणून वादींनी सदरचा बेकायदेशीर दावा दाखल केला आहे. वादींना सदरच्या दाव्यात सकृतदर्शनी वाद नाही. दावा मिळकत प्रतिवादी क्र.४ च्या ताब्यात आहे. जर वादींचा सदरचा तात्पुरत्या मनाईहुकूमाचा अर्ज मंजूर केला तर प्रतिवादी क्र.४ चे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. वादींनी जाणीवपूर्वक प्रतिवादींना त्रास देण्यासाठी सदरचा खोटा दावा दाखल केला आहे. म्हणून त्यांनी वादींचा अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली आहे. प्रतिवादी क्र.५ यांच्या विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, जर वादींनी मागणी केल्याप्रमाणे तात्पुरता मनाई हुकूम दिला तर प्रतिवादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. म्हणून शेवटी त्यांनी वादींचा तात्पुरत्या मनाई हुकूमाचा अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली आहे.

१४. मी सदरच्या प्रकरणांमधील संबंधीत दस्तऐवज पाहिले. नि.क्र.७/२ वर मौजे वडवणी ता. वडवणी, जि. बीड येथील गट नं.२१७ क्षेत्र १४.६७ हे. आर. चा सन २०१८–२०१९ चा ७/१२ उतारा असून त्यावर भोगवटादार सदरी वादी व इतरांची नावे आहेत. नि.क्र.७/४ वर मौजे वडवणी येथील गट क्र.२१४ क्षेत्र ०८.२३ हे. आर. चा सन २०१६ ते २०१९ चा ७/१२ उतारा असून त्यावर भोगवटादार सदरी प्रतिवादी क्र.४ चे नाव ०१.६२ हे. आर वर आहे व उर्वरीत क्षेत्रावर इतर लोकांची नावे आहेत. तसेच सदरची मिळकत वडवणी आठवडी बाजारासाठी मुख्याधिकारी, नगर पंचायत यांचे नावे मालक कब्जेदार सदरी आहे. सदरचे गट क्र.२१४ चे कोणत्याही क्षेत्रावर वादींची नावे भोगवटदार

किंवा कब्जेदार सदरी दिसून येत नाहीत. नि.क्र.७/५ वर मो.र.क्र.११७/२०१७ च्या नकाशाची 'ब' प्रत असून त्यावरुनही दिसून येत नाही की दावा मिळकतीवर वादींचा कब्जा आहे. सदरचे नकाशातील समजुतीच्या टीपेमध्ये कोठेही नमूद केले नाही की दावा मिळकतीवर वादींचा कब्जा आहे. नि.क्र.५९/१ वर माजलगाव न्यायालयाने नि.दि.दा.क्र.५७५/२०१७ च्या हुकूमनाम्याची प्रमाणित प्रत आहे. सदरचा दावा गुलाबचंद पन्नालाल नहार याने म्हणजेच वादींच्या वडीलांनी प्रतिवादी क्र.१, ३ व ४ यांच्याविरूद्ध दाखल केला होता. सदरचे दाव्यात तडजोड होऊन त्या दाव्यातील वादीला दावा मिळकतीमधून म्हणजेच गट क्र.२१४ मधून केवळ गट क्र.२१६ या त्याच्या जमिनीत जाण्या–येण्यासाठी वहिवाटीचा रस्ता ठेवण्यात आलेला आहे व सदरचा रस्ता सार्वजनिक वापरासाठी राहणार असून त्याची कायदेशीर मालकी नगर पंचायत, वडवणी यांची राहील असे ठरल्याचे दिसून येते.

१५. नि.क्र.६१/१ वर जिल्हाधिकारी, बीड यांनी क्र.२०१६/मशाका /जमा–१/प्र.क्र./कावि मध्ये ता.२४.०६.२०१६ रोजी केलेल्या आदेशाची छायांकीत प्रत आहे. सदरचे आदेशान्वये सदरचे दाव्यातील मूळ वादी म्हणजेच गुलाबचंद पन्नालाल नाहर यांनी दावा मिळकतीचे मालकी हक्काबाबतचा केलेला अर्ज फेटाळण्यात आला आहे. नि.क्र. ६१/२ वर नि.दि.दा.क्र.२७८/२०२३ यातील नि.क्र.५ व त्यावरील आदेशाची छायांकीत प्रत आहे. सदरचा तात्पुरत्या मनाई हुकूमाचा अर्ज न्यायालयाने नामंजूर केल्याचे दिसून येते. नि.क्र.६१/३ वर प्रतिवादी क्र.३ ने प्रतिवादी क्र.४ ला हद्द कायम मोजणीची नोटीस जी पाठविली होती त्याची छायांकीत प्रत दाखल केली आहे. सदरची नोटीसही ता.२६.०५.२०२३ रोजीची असून ती मो.र.क्र.२५९ बाबतची व गट क्र.२१४ बाबतची असल्याचे दिसून येते. नि.क्र.६१/४ वर ता.१२.१०.२०२३ चे पंचनाम्याची छायांकीत प्रत असून त्यावरुन दिसून येते की, दावा मिळकतीचे मोजणीबाबतचा सदरचा पंचनामा आहे. नि.क्र.६१/५ वर ता.३०.११.२०२३ चे पंचनाम्याची छायांकीत प्रत असून त्यावरुन दिसून येते की, सदरचे पंचाचे समक्ष दावा मिळकत म्हणजेच गट क.२१४ मधील क्षेत्र चार एकर बाबतचे अभिलेखानुसार हद्दीखुणा करुन दिल्या आहेत.

१६.      सदरचे प्रकरणामधील संबंधीत दस्तऐवज पाहीले असता दिसून येते की, दावा मिळकतीवर सध्या वादींचा कब्जा आहे, हे दर्शविणारा कोणताही प्रथमदर्शनी कागदोपत्री पुरावा वादींतर्फे दाखल करण्यात आलेला नाही. दावा मिळकतीवर वादींनी त्यांचे नाव कब्जेदार सदरी घेण्यासाठी कोणतेही प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. वादींच्या मते ते दावा मिळकतीचे विरूद्ध कब्जा हक्काने मालक झाले आहेत. परंतु वादींनी त्यांचे वादपत्रात विरूद्ध कब्जा हक्काचे सर्व घटकांचे विस्तृत वादकथन केल्याचे दिसून येत नाही. याउलट दावा मिळकतीला मालक व कब्जेदार सदरी प्रतिवादी क्र.४ चे नाव असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. वादींनी प्रतिवादीविरूद्ध दाखल केलेल्या नि.दि.दा.क्र.५७५/२०१७ मध्ये तडजोड झाल्याचे दिसून येते. सदरच्या तडजोडीत प्रतिवादी क्र.४ ने वादींना त्यांच्या गट क्र.२१६ मध्ये जाण्यासाठी फक्त रस्ता दिल्याचे दिसून येते. त्या तडजोडीत प्रतिवादी क्र.४ ने कोठेही मान्य केले नाही की दावा मिळकतीवर वादींचा कब्जा आहे. मी वादींतर्फे दाखल करण्यात आलेला अधिनिर्णय, **"रामे गौडा (पश्चात)"** वाचून पाहिला. सदरचे अधिनिर्णयात मा. सर्वोच्च न्यायालयाने निर्वाळा दिला आहे की, जर एखाद्या व्यक्तीचा एखाद्या मिळकतीवर दीर्घ कब्जा असेल तर त्या व्यक्तीला कायदेशीर मार्गाचा अवलंब केल्याशिवाय त्यातून बेदखल करता येत नाही. परंतु माझे हातातील प्रकरणातील तथ्य व सदरचे अधिनिर्णयातील तथ्य भिन्न असल्यामुळे सदरचे अधिनिर्णयातील प्रमाण सदरचे हातातील प्रकरणास लागू होत नाही. सदरच्या प्रकरणातील दावा मिळकतीवर वादींचा सध्या कब्जा आहे, हे वादींना प्रथमदर्शनी शाबीत करता आले नाही.

१७.      मी वर नमूद केल्याप्रमाणे वादींना त्यांचा दावा मिळकतीवर कब्जा आहे हे प्रथमदर्शनी शाबीत करता आले नाही. तसेच वादींनी ते दावा मिळकतीचे विरूद्ध कब्जा हक्काने मालक झाले आहेत, हे दाखविणारा प्रथमदर्शनी पुरावा सदरचे प्रकरणात दाखल केला नाही. वादींनी सदरचे दाव्यात विरूद्ध कब्जा हक्काबाबतचे सर्व घटकांबाबत सखोल वादकथन केले नाही. वादी हे दावा मिळकतीचे विरूद्ध कब्जा हक्काने मालक झाले आहेत किंवा कसे हे दाव्याचे अंतीम कामकाज चालल्यावरच स्पष्ट होईल. परंतु मी वर नमूद केल्याप्रमाणे दावा मिळकतीवर वादींचा कब्जा असल्याचे वादींना प्रथमदर्शनी शाबीत करता आले नाही. दावा मिळकत ही प्रतिवादी क्र.४ च्या ताब्यात ता.०६.०१.१९७१ पासून

असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे सदरचे प्रकरण प्रतिवादींच्या लाभात प्रथमदर्शनी असल्याचे दिसुन येते. त्यामुळे वरील विवेचनाच्या आधारावर मी या निष्कर्षास आलो आहे की, हे प्रकरण प्रथमदर्शनी वादींच्या बाजूने नाही. म्हणुन मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी नोंदवीत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबत</u>**

१८. प्रतिवादी क्र.४ ने त्याच्या जबाबात कथन केले आहे की, त्याच्या मालकीच्या काही क्षेत्रावर काही लोकांनी बीडकडे जाणारे रस्त्याचे बाजूने म्हणजेच उत्तरेकडील बाजूने अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे त्याने संबंधीत अतिक्रमण धारकांना ग्रामपंचायत अधिनियम,१९५८ चे कलम–५३ प्रमाणे ता.३१.०८.२०१३ रोजी कायदेशीर नोटीसा देऊन अतिक्रमण काढण्याबाबत कळवले. त्यानंतर संबंधीत अतिक्रमण धारकांनी त्याच्यासह जिल्हाधिकारी, बीड व विभागीय आयुक्त औरंगाबाद यांचेविरूद्ध मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका क्र.१११३/२०१४ दाखल केली होती. सदरचे याचिकेत मा. उच्च न्यायालयाने ता.१७.०२.२०१६ रोजी आदेश करुन मा. जिल्हाधिकारी, बीड यांना नोटीस देऊन नियमानुसार निर्णय घेण्याचे व कार्यवाही करण्याचे आदेशीत केले. सदरचे आदेशानुसार जिल्हाधिकारी, बीड यांच्यासमोरील संचिका क्र.२०१६/मशाका/जमा–१/प्र.क्र./कावि यामध्ये वादींनी ता.०९.०३.२०१६ रोजी अर्ज देऊन त्याला सामील करण्याची मागणी केली व ती मंजूर करण्यात आली होती. त्यानंतर जिल्हाधिकारी, बीड यांनी वादी व प्रतिवादी क्र.४ यांचे म्हणणे ऐकूण वादीची मागणी ता.२४.०६.२०१६ रोजी फेटाळून लावली. त्यामध्ये वादीचे मालकी हक्काबाबतची मागणीसुद्धा फेटाळण्यात आलेली आहे.

१९. जिल्हाधिकारी यांचे आदेशानुसार संबंधीत अतिक्रमण धारकांनी अतिक्रमणे काढून टाकली व त्यावर सध्या प्रतिवादी क्र.४ चा मालकी हक्क व कब्जा आहे. वादीने ता.२४.०६.२०१६ च्या जिल्हाधिकारी यांच्या निर्णयाविरूद्ध विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ चे कलम–२५७ अन्वये अपील दाखल केले आहे व ते प्रलंबीत आहे. सदरचे अपील प्रलंबीत असताना वादीने पुन्हा जिल्हाधिकारी यांच्या त्याच आदेशाविरूद्ध याचिका क्र.१३७४८/२०१७ ही दाखल केली असून ती

प्रलंबीत आहे. सदरची दोन्ही प्रकरणे न्यायप्रविष्ट असताना वादींनी सदरचा बेकायदेशीर दावा दाखल केला आहे.

२०. थोडक्यात वादींनी जिल्हाधिकारी, बीड यांच्यासमोरील संचिका क्र.२०१६ /मशाका/जमा–१/प्र.क्र./कावि यातील ता.२४.०६.२०१६ च्या आदेशाबाबत व ता.२४.०६.२०१६ च्या जिल्हाधिकारी यांच्या निर्णयाविरूद्ध विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम–२५७ अन्वये अपील दाखल केल्याबाबत व त्याच आदेशाविरूद्ध मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका क्र.१३७४८/२०१७ दाखल केल्याबाबत दाव्यात काहीही कथन न करता त्या महत्वाच्या बाबी लपवुन ठेवल्या असल्याचे दिसून येते. तसेच त्याबाबतचे कागदपत्रसुद्धा त्याने दाव्यात दाखल केले नाहीत. सदरच्या बाबी दाव्यासाठी महत्वाचे घटक आहेत. वरील सर्व कारणावरुन स्पष्ट होते की, वादी हे न्यायालयासमोर स्वच्छ हाताने आले नाहीत. सदरचे मुद्दयाचे प्रित्यर्थ मी पुढील न्यायनिर्णयांचा आधार घेत आहे.

१. *एस.पी.चेंगालवरया नायडू(मयत) कायदेशीर वारसांमार्फत–विरुद्ध–जगन्नाथ(मयत) कायदेशीर वारसांमार्फत, ए.आय.आर. १९९४ सर्वोच्च न्यायालय, पान क्र. ८५३.*
२. *रोहीत धवन, वादी–विरुद्ध– जी.के. मल्होत्रा आणि इतर प्रतिवादी, ए.आय.आर. २००२, दिल्ली, पान क्र. १५१.*
३. *बाबुराव गणपत माळी (मयत) वारसांमार्फत –विरुद्ध– बाळासाहेब आण्णा पाटील आणि इतर, २००७(२) ऑल.एम.आर. ३६४.*
४. *हरचरणजितसिंग थिंड–विरुद्ध–दिक्षा थिंड आणि इतर, २००८(३) महाराष्ट्र लॉ जर्नल ५८७.*

२१. सदरचे वरील अधिनिर्णयात मा. वरीष्ठ न्यायालयांनी निर्वाळा दिला आहे की, जर कोणत्याही पक्षकाराने वादातील महत्वाची माहिती जाणीवपूर्वक मुद्दाम न्यायालयापासून लपवून ठेवली तर त्याला मनाई हुकूम नाकरण्याचे हे एक प्रमुख कारण असेल. तसेच जो पक्ष न्यायालयाकडून न्यायाची मागणी करतो त्याने प्रथम न्यायालयाकडे स्वच्छ मनाने आले पाहिजे व त्याने सर्व महत्वाच्या गोष्टी उघड केल्या पाहिजेत व जर त्याने सर्व महत्वाच्या गोष्टी उघड केल्या नाहीत तर त्याला मनाई हुकुमाची दाद मिळणेस तो

हक्कदार नसेल. तसेच ज्या पक्षाचा दावा खोटा असेल त्याला न्यायालयाकडून दाद मिळणेचा अधिकार नाही. मनाई हुकुमाची दाद ही स्वेच्छाधीन व न्यायाला अनुसरुन असते व जर एखाद्या पक्षाने महत्वाची गोष्ट न्यायालयापासून लपविली तर तो तात्पुरत्या मनाई हुकुमाची स्वेच्छाधीन दाद मिळणेस पात्र नसतो व न्यायालय त्याला मदत करु शकत नाही. वरील विवेचनाच्या आधारावर मी या निष्कर्षास आलो आहे की, वादी हे स्वच्छ हाताने न्यायालयासमोर आलेले नाहीत. म्हणून मी मुद्दा क्र.२ चे उत्तर नकारार्थी नोंदवीत आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ ते ५ बाबत</u>**

२२. मी वर नमुद केल्याप्रमाणे सदरचा वाद वादींच्या बाजूने सकृत दर्शनी असल्याचे वादींना प्रथमदर्शनी शाबीत करता आले नाही. तसेच वादी हे न्यायालयासमोर स्वच्छ हाताने आले नाहीत. त्यामुळे वादींनी मागितलेला तात्पुरता मनाई हुकूम देणे न्यायोचीत होणार नाही. असा हुकुम जर वादींच्या लाभात दिला तर प्रतिवादी क्र.४ चे अपरिमीत व कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. म्हणुन सदरचे परिस्थीतीमध्ये मी या निर्णयास आलेलो आहे की, या प्रकरणात न्यायाचा समतोल वादींच्या बाजुने झुकणारा नाही. तसेच वादींच्या लाभात तात्पुरता मनाई हुकुम दिला नाही तर त्यांचे काहीही नुकसान होणार नाही. तसेच, जरी त्यांचे काही नुकसान झाले तरी ते पुरेसे पैशांचे स्वरुपात भरुन देता येऊ शकते. म्हणुन मी मुद्दा क्र. ३ ते ५ चे उत्तर त्याप्रमाणे नोंदवून खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वादींचा अर्ज नि.क्र.५ नामंजूर करण्यात येत आहे.

२. या अर्जाचा खर्च मुळ दाव्याचे कामी करण्यात येईल.

दिनांक – ०२/०२/२०२४.

(सो. द. घनवट)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
माजलगाव.

**<u>शेरा</u>**

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | श्री. हनुमंत बळवंतराव सूर्यवंशी |
| कोर्टाचे नाव | – | दि. न्या. व. स्तर, माजलगाव |
| न्यायनिर्णयाचा मजकूर सांगितल्याचा दिनांक | – | ०२/०२/२०२४ |
| न्यायनिर्णय टंकलिखित केलेला दिनांक | – | ०२/०२/२०२४ |
| न्यायनिर्णय स्वाक्षरीत केल्याचा दिनांक | – | ०२/०२/२०२४ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | – | ०२/०२/२०२४ |

स्वाक्षरीत/–

दिनांक – ०२/०२/२०२४

(ह. ब. सूर्यवंशी)
लघुलेखक ग्रेड – २,
दिवाणी न्यायालय, व. स्तर, माजलगाव